महाराष्ट्र शासन

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

## प्रमाणक शल्यचिकित्सक प्राधिकृती

**आदेश क्र :**

मी डॉ. संतोष नाईकवाडे, प्रमाणक शल्य चिकित्सक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई,कारखाने अधिनियम १९४८ (१९४८ च्या त्रेसष्ट ) च्या कलम १०(२) अनुसार प्रदान केलेल्या शक्तिचा वापर करून आणि शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.एफएसी-२०२४/प्र.क्र.१२, काम-४, दिनांक: २४.०१.२०२४ नुसार **डॉ. गणेश वडगांवकर, ब्राईट स्माईल क्लिनिक, बी /३५/३ अकरावी योजना, चिंतामणी किराणा समोर, शिवाजीनगर रोड, औरंगाबाद – ४३१ ००९** यांना खालील अटींच्या अधीन राहून **औरंगाबाद** जिल्ह्यासाठी आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षासाठी प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृत करत आहे.

| कालावधी दिनांक - 29 JAN 2024 | पासून दिनांक - 28 JAN 2026 | पर्यंत |
|---|---|---|

अटी

१. प्रमाणक शल्यचिकित्सक हा एखाद्या कारखान्याचा भोगवटादार किवा त्या कारखान्यात किंवा त्यात चालणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत किंवा धंद्यात किंवा त्या कारखान्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही पेटंटात, यंत्रसामुग्रीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने त्यांचा हितसंबंध असलेला किंवा कारखान्यात फॅक्टरी मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत नसावा.

२. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम १०(४)(अ)(ब)(क) व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या नियम १८ च्या तरतुदीनुसार कर्तव्ये पार पाडावीत.

३. कारखान्यातील कामगारांची वैद्यकीय तपासणी करताना प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सक स्वतः हजर राहिले पाहिजे. तसेच त्यांनी केलेल्या तपासणी बाबत मासिक अहवाल फोटोग्राफसह संचालनालयास पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत न चुकता सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावा व एक प्रत संबंधित विभागीय संचालनालयास द्यावी.

४. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी प्रत्येक वर्षी किती कामगारांची आरोग्य तपासणी केली, त्याची संख्या, त्यापैकी किती कामगारांना व्यावसायिक आजार (Occupational Disease) व अन्य आजार झाल्याचे आढळले याबाबत सविस्तर अहवाल कारखान्यांच्या आस्थापनानिहाय व रुग्णनिहाय संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई, यांना सादर करावा.

५. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी त्यांना प्राधिकृत केलेल्या कालावधीनंतर तसेच कार्यक्षेत्राच्या बाहेर काम करू नये.

६. वैद्यकीय तपासणीसाठी शासनाने ठरविलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारण्यात येऊ नये.

७. कारखान्यातील कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचे वेळापत्रक संचालनालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई ( वैद्यकीय शाखा ) तसेच संबंधित कार्यालयास कारखान्याचे नाव व पत्ता यांच्यासह किमान पंधरा दिवस आधी सादर करण्यात यावे.

८. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी दिलेल्या माहितीस काहीही बदल झाल्यास त्यांनी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना त्याबाबत एक महिन्याच्या आत कळविणे बंधनकारक राहील.

९. वरील कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून केलेली प्राधिकृती रद्द करण्यात येईल.

१०. प्राधिकृतीच्या नुतनीकरणाचा अर्ज कालावधी संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर विहित नमुन्यात सर्व कागदपत्रे व अर्जशुल्कासह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना सादर करावे.

क्र. औ. सु. व. आ/ वैद्यकीय / 3800-03 /१०
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय
कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक-ई, सी-२०,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पुर्व), मुंबई- ४०००५१
दिनांक: 29 JAN 2024

(डॉ .संतोष नाईकवाडे)
प्रमाणक शल्यचिकित्सक
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**नोट-** प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी तपासणी केल्यानंतर प्रमाणपत्रात खालील प्रमाणे नमूद करून किंवा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.पत्रव्यवहार करताना प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सक क्रमाकाचा उल्लेख करावा.

( स्वाक्षरी )
कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम १०(२) प्रमाणे
**औरंगाबाद** जिल्ह्याकरिता दिनांक- ...................... पासून....................पर्यंत.
**प्राधिकृत प्रमाणकशल्यचिकित्सक क्र. ACS04-GW/2024**

प्रत माहितीसाठी सादर-

१. डॉ. गणेश वडगांवकर, ब्राईट स्माईल क्लिनिक, बी /३५/३ अकरावी योजना, चिंतामणी किराणा समोर, शिवाजीनगर रोड, औरंगाबाद – ४३१ ००९
२. सहसंचालक – औरंगाबाद
३. आदेश वही.